**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ**

शासन महसूल व वन विभाग, निर्णय क्रमांक ईएसटी-२०१०/प्र.क्र.४२/ई-८ दिनांक ६ एप्रिल,२०११ व समक्रमांकाचे दिनांक ३० जूलै,२०११ मधील तरतूदी नुसार विधी अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने एका वेळी ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरावयाचे असून त्याकरिता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून विहित नमून्यात दिनांक १२ सप्टेंबर,२०११ पर्यंत अर्ज मागविण्यांत येत आहे.

---

| | |
|---|---|
| पदाचे नांव | :- विधी अधिकारी |
| पद संख्या | :- ०१ (एक) |
| मासिक वितलब्धी | :- एकत्रित मानधन रु. २०,०००/-+ दुरध्वनी व प्रवास खर्च रु. ५०००/- असे एकत्रित मानधन रु. २५,०००/- प्रति महिना. या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय होणार नाहीत. |

**शैक्षणीक अर्हता व अनूभव :-**

१. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदविधर असेल.तो सनद धारक असेल.
२. विधी अधिकारी या पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान सात वर्षाचा अनूभव आवश्यक आहे.
३. उमेदवार महसूल विषयक, सेवा विषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती व विभागीय चौकशा इत्यादी बाबत ज्ञान संपन्न असेल.ज्यामूळे कायदेविषयक कार्यवाही तो सक्षमतेने पार पाडू शकेल.
४. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल.
५. विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियूक्तीचे वेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसेल.

**विधी अधिकारी यांचे कर्तव्ये व जबाबदा-या :-**

१. कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदे विषयक बाबीबाबत/न्यायालयीन प्रकरणे सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
२. महसूल विषयक/परिच्छेद निहाय अभिप्राय (Parawise Comments) तयार करणे/सेवा विषयक/ प्रशासकीय बाबी/ विभागीय चौकशी इत्यादी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापीत स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
३. प्रलंबीत न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे पाठपूरावा करणे जिथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-याच्या मदतीने तयार करणे.
४. शपथपत्राचा मसूदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.
५. जिथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयांचा अभ्यास करुन तद्नूषंगाने अपिल दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
६. अपिल करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपिलाचा मसूदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपूरावा करणे.
७. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

**नेमणूकीचे स्वरुप:-**

विधी अधिकारी हे पद नियमीत स्वरुपात नसून ११ महिन्यांकरिता कंत्राटी तत्वावर भरण्यात येईल. सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाहीत.

**पदभरतीबाबत कार्यक्रम:-**

| | | |
|---|---|---|
| १. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | :- | १२ सप्टेंबर,२०११ |
| २. पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | :- | १५ सप्टेंबर,२०११ |
| ३. प्रसिध्द केलेल्या यादीमधील चूकीबाबत उमेदवारांनी कार्यालयामध्ये समक्ष लेखी अर्ज करण्याची अंतिम तारीख. | :- | १७ सप्टेंबर,२०११ |
| ४. झालेल्या चुकांची दुरुस्ती करुन पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | :- | १९ सप्टेंबर,२०११ |

५. उमेदवारांचे प्राविण्य पडताळणीसाठी आवश्यकता वाटल्यास लेखी चाचणी अथवा प्रत्यक्ष मुलाखत अथवा दोन्ही घेण्याची सूचना दिनांक २० सप्टेंबर,२०११ रोजी कार्यालयाचे सूचना फलकावर व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**आवश्यक सूचना:-**

१. वरिल शैक्षणीक पात्रता व अनूभवामधील अ.क्र. १ ते ५ बाबतची सर्व कागदपत्रे/ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**२. सदर जाहीरात व सदर पदाकरिता विहित नमून्यातील अर्ज,लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र या कार्यालयाचे http//:yavatmal.nic.in या संकतेस्थळावर उपलब्ध आहे.**

**३. उमेदवारांनी विहित नमून्यातील अर्ज A4 आकाराच्या कागदावर एका बाजूस टंकलिखित/संगणीकृत करुन जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ या पत्त्यावर दिनांक १२ सप्टेंबर,२०११ पर्यंत सादर करावे. विहित मूदतीनंरत प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही.**

४. उमेदवरांचे प्राविण्य पडताळणीसाठी आवश्यकता वाटल्यास लेखी चाचणी अथवा प्रत्यक्ष मुलाखत (तोंडी) अथवा दोन्ही घेण्यात येईल. याबाबतची सूचना दिनांक १९ सप्टेंबर,२०११ रोजी संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सूचना फलकावर लावून प्रसिध्द करण्यात येईल.

५. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराचे नांव यथावकाश कार्यालयाचे सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६. निवड झालेल्या उमेदवाराने विहित नमुन्यातील करारनामा करुन देणे् बंधनकारक आहे. करारनामा करुन दिल्यानंतर निवड झालेल्या उमेदवारास कंत्राटी पध्दतीने नेमणूक करीत असल्याचे आदेश देण्यात येईल.

७. कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी या पदावर नेमणूक झालेल्या उमेदवारास त्यांचे नेमणूकीचे पदाची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील.

८. या प्रक्रीयेमध्ये बदल करण्याचा स्थगीत/रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती,यवतमाळ यांना राहील.



स्थळ:- यवतमाळ

दिनांक:- २५ ऑगष्ट,२०११

**(श्रावण हर्डीकर)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती,यवतमाळ**